**CNR NO. MHMM150039142008**

प्राप्त दिनांक : २२.०२.२००८
नोंदणी दिनांक : २२.०२.२००८
निकाल दिनांक : ०३.११.२०२३
कालावधी वर्ष महिने दिवस
१५—०८—१२

**निशाणी :—38**

**दादर येथील महानगर दंडाधिकारी, (१३ वे न्यायालय,) यांच्या न्यायालयात,**

**दादर, मुंबई**

**(पीठासीन अधिकारी श्रीमती क्रांती म. पिंगळे यांचे समोर)**

**फौजदारी खटला क्र. ९८/पी.डब्लु/२००८**

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५५ अन्वये न्यायनिर्णय**
(घोषित दिनांक ०३/११/२०२३)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | फौजदारी खटला क्रमांक | : | ९८/पी.डब्लु/२००८ |
| २ | गुन्हयाची तारीख | : | दिनांक २७.१२.२००७ |
| ३ | अभियोग पक्षाचे नाव | : | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत : पोलिस ठाणे, ना. म. जोशी मार्ग,<br>गु.र.क्र. ३९४/२००७ |
| ४ | आरोपीचे नाव व पत्ता | : | २.संजय प्रदिप राउत,<br>वय : १९ वर्षे, व्यवसाय: नाही<br>राहणार—झोपडा नं. २६ धनमिल नाका,श.ल. मटकर मार्ग,नेताजी सुभाष नगर, मुंबई. |
| ५ | दोषारोप किंवा सिध्द | : | भारतीय दंड विधान कलम ३८०, ४५४ व ४५७ अन्वये. |
| ६ | आरोपीची गुन्हा कबुली असल्यास | : | आरोपीने गुन्हा कबुल केला नाही. |
| ७ | अंतिम आदेश | : | आरोपीची ३८०, ४५४ व ४५७ गुन्हयाच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| ८ | आदेशाची तारीख | : | ०३.११.२०२३. |

---

अभियोग पक्षातर्फे वकील श्री. संतोश जी गाढवे

आरोपीतर्फे वकील श्री. अरूण दास

---

सदरचा खटला अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द शिक्षाधीन कलम ३८०, ४५४ व ४५७ अन्वये खटला दाखल केला आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः—**

०२) दिनांक २८.१२.२००७ रोजी तक्रारदाराचा मित्र नामे सचिन भावसार यांस त्याचे मोबाईलवर त्यांच्या दुकानास बाजुस असलेल्या भंगार विक्री करणा—या इसमाने तक्रारदाराच्या दुकानाचे शटर कोणीतरी उचकटल्याचे सांगितले व त्यानंतर सचीन भावसार यांनी यांनी त्यांना सदर घटनेबाबत दिनांक २८.१२.२०१७ रोजी सकाळी ०८.०० वाजता त्यांचे घरी येउन माहीती दिली. त्यामुळे तक्रारदार लगेच त्याचे दुकानात गेले असता कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या दुकानाचे शटरचे कुलुप तोडुन शटर वाकवल्याचे त्यांना दिसल्याने त्यांनी लगेच पोलीस ठाणेत येउन नमुद हकीकत कळवली. त्यानंतर ते पोलीसांसमवेत त्यांचे दुकानाचे ठिकाणी गेले असता सर्व सामानाची पाहणी केली असता त्यांच्या दुकानातुन आलेले वेगवेगळया कंपन्याचे एकुण जुने ३५ वापरते मोबाईल किंमत अंदाजे ५०,००० रोख रूपये २,००० असे एकुण ५२ हजार रूपये अज्ञात इसमाने दुकानाचे शटर तोडुन लोखंडी शटर वाकवुन दुकानामध्ये प्रवेश करून आतील शोकेसची काच तोडुन टेबलाचे ड्रॉवर उचकटुन वरील किंमतीचा ऐवज चोरून नेला म्हणुन अज्ञात इसमाविरूध्द ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

०३) सदर तक्रारीवरून आरोपी विरूध्द ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. ३९४/२००७ नोंदविण्यात आला. त्याचे तपासकाम पोलीस उपनिरीक्षक यशवंत काळु महांगरे यांनी केले. तपासा दरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवुन घटनास्थळ पंचनामा केला. तपासकामाचे पुर्ततेनंतर त्यांनी आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४) आरोपीविरूध्द माझे पुर्वाधिकारी यांनी निशाणी क्रमांक ३ वर कलम ३८०, ४५४ व ४५७ भारतीय दंड संहीता अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयांसाठी दोषारोप निश्चित केलेले आहे. आरोपी क्र १ हा न्यायालयासमोर हजर झाला नाही. आरोपी क्र २ हजर झाल्याने माझे पुर्वज माननिय साहेबांनी आरोपी नं २ पासुन केस वेगळी करून आरोपी क्र. २ विरूध्द दोषारोप ठेवले. आरोपी क्र २ ला त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप त्याचे बोलीभाषेत समजावुन सांगण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबुल करून सर्व आरोपांचे खंडण केले. अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांचे जबाब नोंदवुन झाल्यावर आरोपीचा फौ.प्र. संहिता कलम ३१३ प्रमाणे निशाणी ३७ला जबाब नोंदविण्यात आला. आरोपीने त्याचेविरूध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला आहे. दोन्ही बाजुंतर्फ विधिज्ञांचे अंतिम युक्तीवाद ऐकले.

०५) प्रस्तुत कामी खालील मुद्दे उपस्थीत होत असुन त्यावरील निष्कर्ष त्यांचे कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवित आहे:—

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| (१) | दिनांक २७/१२/२००७ रोजी २२.१५ ते २८.१२.२००७ रोजीचे सकाळी ८.०० वाजण्याच्या दरम्यान आरोपी क्र. २ यांनी अन्य आरोपींसोबत संगनमताने तक्रारदाराच्या दुकानात लपुन छपुन प्रवेश करून घरफोडी केली, असे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी. |
| (२) | वरील नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र २ यांनी इतर आरोपीशी संगनमत करून तक्रारदाराच्या दुकानात रात्रीच्या वेळी ३५ वेगवेगळया कंपन्यांचे वापरते मोबाइल व रोख रक्कम २,०००/— असे एकुण ५२,०००/— चा ऐवज लबाडीने चोरी केला असे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | ..नाही. |
| (३) | अंतिम आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करणेत आहे. |

**—:: <u>का र ण मि मां सा</u> ::—**

०६) अभियोग पक्षाने आरोपीविरूध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरता एकुण ५ साक्षीदारांचा जबाब नोंदविलेला आहे. साक्षीदार क्र १ फिर्यादी गोविंद आनाजी

सावंत यांची साक्ष निशाणी ०७ वर, साक्षीदार क्र २ जयवंत सिताराम भोगले यांची साक्ष निशाणी १० वर, साक्षीदार क्र ३ रमेश कुमार काळुलालजी जैन यांचा जबाब निशाणी १५ वर, साक्षीदार क्र ४ दिपक राजाराम चव्हाण यांची साक्ष निशाणी ३३ वर नोंदविली. साक्षीदार क्र ५ यशवंत काळु महांगरे यांची साक्ष ३६वर नोंदविण्यात आली आहे. फिर्याद निशाणी ८वर, घटनास्थळ पंचनामा निशाणी ११ वर, निवेदन पंचनामा निशाणी ३४ वर नोंदवला आहे.

**मुद्दा क्र. १ व २ करीता** :—

०७) अभियोग पक्षाने आरोपी विरूध्द असा आरोप ठेवला आहे की, त्याने आरोपी क्र १ चे संगनमताने तक्रारदाराच्या दुकानाचे मध्यरात्री दरवाजाचे शटर तोडुन, कुलुप तोडुन त्याचे दुरूस्तीला आलेले वेगवेगळया कंपनीचे मोबाइल व रोख रक्कम २,०००/ रूपयांची चोरी केली. अभियोग पक्षाने याकामी एकुण ५ साक्षीदार तपासलेले आहेत. साक्षीदार क्र १ हे स्वतः तक्रारदार आहेत. त्यांनी त्यांच्या तक्रारीप्रमाणे साक्ष दिलेली आहे. त्याची तक्रार निशाणी ८ला आहे. साक्षीदार क्र १ हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. त्यांना त्यांच्या दुकानातुन मोबाइल व रोख रक्कम चोरीला गेल्याचे ते घटनास्थळी आल्यावर कळाले. त्यामुळे सदरहु साक्षीदाराच्या साक्षीवरून हे सिध्द होते की, दिनांक २७.१२.२००७ च्या मध्यरात्री त्यांचे दुकान फोडुन त्यांच्या दुकानातील मोबाईल व रोख रक्कम २,०००/— रूपये चोरी झालेली आहे.

०८) साक्षीदार क्र २ हे घटनास्थळावरचे पंच आहेत पोलीसांनी ज्यावेळी माहीती देण्यात आली तेव्हा नामजोशी मार्ग पोलीस अधिका—यांनीह घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला तो निशाणी ११वर आहे. सदर पंचनामेवरून तक्रारदाराच्या दुकानात चोरी झाली हे सिध्द होते. परंतु ती चोरी आरोपीने केली आहे याचा कोठेही बोध होत नाही. साक्षीदार क्र ३ यांनी त्यांना घटनेची माहीती मिळाल्याचे कथन केले आहे. परंतु साक्षीदार क्र १ ते ३ यांच्या साक्षीवरून घटना घ डल्याचे सिध्द होत आहे. वास्तविक तक्रारदाराने तक्रार ही अज्ञांत इसमांविरूध्द दिलेली आहे. प्रस्तुत केस ही दुकानाची तोडफोड करून, शटर उघडुन प्रवेश करून

चोरी केल्याची आहे. व ती घटना मध्यरात्री घडली आहे. त्याच्यामुळे या केसमध्ये आरोपीनेच ही चोरी केली हे सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाची आहे.

०९) यातील साक्षीदार क्र ४ हे महत्वाचे साक्षीदार आहेत. कारण ते या प्रकरणातील तपासी अंमलदार आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की ते सन २००७ मध्ये नामजोशी मार्ग पोलीस स्टेशन येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणुन कार्यरत असताना आरोप आरोप क्र १ फर्नाडीस याने गुन्हयांची कबुली दिली होती. त्यावरून त्याचा निवेदन पंचनामा करून त्याने सांगितलेल्या ठिकाणी जाउन आरोपी क्र २च्या घरातुन मुद्देमाल जप्त केला असे सांगितले आहे. वास्तविक आरोपी क्र १ फर्नाडीस हा आजतगायत न्यायालयासमोर आलेला नाही. त्याच्याविरूध्द अजामिनपात्र वॉरंट जारी केले आहे. या साक्षीदाराच्या म्हणण्यानुसार फर्नाडीसने गुन्हयांची कबुली दिली. त्याने त्याचा साथीदार संजय राउत आरोपी क्र २ हा होता असे त्याने सांगितले परंतु भारतीय पुरावा कायदया अंतर्गत पोलीसांसमोर दिलेल्या गुन्हयांच्या कबुलीचा जबाब हा ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे तो मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातुन मिळुन आला ते आरोपीचे राहते घर होते हे दाखवणे गरजेचे होते. सदर जप्ती ठिकाण झोपडा क्र २६, सुभाषचंद्र नेताजी नगर, एलफिस्टन, मुंबई येथे असुन तो आरोपीचा राहण्याचा पत्ता आहे. किंवा आरोपी तेथेच राहतो याबाबतचा कोणताही पुरावा न्यायपटलावर नाही. वास्तविक कामील फर्नाडीसने आरोपी क्र १ ने लिहुन दिलेल्या गुन्हयांच्या जबानीवर सदरचा पंचनामा सिध्द झालेला आहे. या आरोपीने कोठेही गुन्हयांची कबुली दिलेली नाही किंवा आरोपीने मुद्देमाल काढुन दिलेला नाही.

१०) आरोपीविरूध्द दोषारोप सिध्द झाल्यामुळे त्यांनी कथन केले आहे की, तपासामध्ये कामील फर्नाडीस व संजय राउत यांची नावे निष्पन्न झाली आहेत. परंतु त्या गुन्हयांमध्ये आरोपी आरोपी संजय राउत याला जोडण्याकरता कामील फर्नाडीसच्या तोंडी गुन्हयांच्या कबुली व्यतिरीक्त काही पुरावा नाही आणि त्याने जी गुन्हयांची कबुली दिली ती कायदयाने ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे आरोपी संजय राउत याचेकडुन या केस मधील मुद्देमाल मिळुन आला याबाबत कोणताही

पुरावा नाही. त्यामुळे या आरोपी क्र २ला जोडण्याइतपत कोणताही सबळ पुरावा न्यायपटलावर आलेला नाही. त्यामुळे आरोपी क्र त्यांचे विरूध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. करीता मी मुद्दा क्र १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवते.

**मुद्दा क.३**

११) वर चर्चिलेप्रमाणे मुद्दा क्र. १ व २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्यामुळे आरोपी क्र २ संजय राउत त्याचे विरूध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपातुन निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. आरोपी क्र १ विरूध्द निवेदन पंचनामेबाबत पुरावा न्यायपटलावर दाखल असल्याने प्रस्तुतच्या प्रकरणांमध्ये आरोपीला हजर करून घेउन केस चालवणे आवश्यक आहे. करीता मुद्दा क्र. ३ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करणेत येत आहे :—

## —: आदेश :—

(०१) आरोपी क्र २ यांची भारतीय दंड विधान कलम ३८०, ४५४, ४५७ अन्वये गुन्हयांच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

(०२) आरोपी क्र २ यांनी रक्कम रूपये १५,०००/— वैयक्तिक बंधपत्र फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ४३७अ नुसार सहा महिन्यांसाठी भरून दयावे.

(०३) सदरची केस आरोपी क्र १ विरूध्द चालु राहील.

(०४) आरोपी क्र १ विरूध्द अजामिनपात्र वॉरन्ट काढण्यात यावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात आरोपी क्र २ च्या हजेरीत जाहीर केला.

sd/-

दिनांक:— ०३.११.२०२३

(क्रांती म. पिंगळे)
महानगर दंडाधिकारी,
१३ वे न्यायालय, दादर, मुंबई.

ठिकाण : दादर, मुंबई.